नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०१/१२/२०२५ (सोमवार )**

# नगर परिषद/नगर पंचायत निवडणुक २०२५ साठी नागपुर ग्रामीण पोलीस सज्ज

दिनांक ०२/१२/२०२५ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील सावनेर, कळमेश्वर, मोहपा, खापा, काटोल, नरखेड, कन्हान पिपरी, उमरेड, रामटेक, बोरी अशा एकुण ११ नगर परिषद तसेच मोवाड, कोंढाळी, कांद्री, मौदा, भिवापूर, पारशिवनी अशा एकुण ०५ नगरपंचायत अंतर्गत मतदान प्रक्रीया संपन्न होणार आहे._निवडणुक प्रक्रिये दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यासाठी नागपुर ग्रामीण पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे.

नगर परिषद /नगर पंचायत सार्वत्रिक निवडणुक २०२५ बंदोबस्ताकरीता नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी हे आपआपल्या उपविभागात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत सर्तक पेट्रोलीग करीत आहे. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण यांनी मतदान केंद्रे बंदोबस्त, सेक्टर पेट्रोलींग तसेच स्ट्रॉग रूम बंदोबस्त, एस.एस.टी पथके, एफ. एस. टी. पथके तसेच राखीव बंदोबस्त असा बंदोबस्त लावला आला आहे. संवेदनशिल मतदान केंद्रावर अतिरिक्त बंदोबस्त असुन बंदोबस्तासाठी बाहेरून अतिरिक्त बंदोबस्त राज्य राखीव दलाचे पथक आणि ७०० गृहरक्षक नेमण्यात आले आहे. सदर बंदोबस्तात उपविभागिय पोलीस अधिकारी यांच्या सह १८ पोलीस निरीक्षक, ९६ सपोनि/पोउपनि, ११७४ पोलीस अंमलदार, ७०० गृहरक्षक ,तसेच राज्य राखीव दल –०२ कंपनी, दंगा नियंत्रण पथक – ०२ पथक, जलद प्रतिसाद पथक (क्यु आर टी) –०२ पथक आणि अधिक ०६ पथके नेमण्यात आली आहे.

**प्रतिबंधात्मक कारवाई** :— मागील एक महीन्यात नगर परीषद/ नगर पंचायत निवडणुकींच्या अनुषंगाने ७७ आरोपीतांना तडीपार केले आहे. एम.पी.डी.ए कायदयान्वये ६ आरोपीतांना स्थानबध्द करण्यात आले आहे. संघटीत गुन्हेगारी करणाऱ्या ३ टोळींवर MCOCA अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे, ( एकुण १९ आरोपी). कलम १२४ मपोका अन्वये १५ गुन्हे दाखल असुन कलम १२२ मपोका अन्वये १८ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. वारंवार दारू विक्रेते आरोपीतांवर १८७ आरोपीतांवर मदाका कलम ९३ अन्वये कार्यवाही करण्यात आली आहे. कलम १२९ भा.ना.सु.सं अन्वये ४०९ आरोपीतांवर तर कलम १२६ भा.ना.सु.सं अन्वये २३२ आरोपीतांवर कार्यवाही केली असुन, बंधपत्र उल्लंघनाबाबत कार्यवही करून एकुण ६,२०,०००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच बंधपत्राचे उल्लंघन केलेल्या ९ आरोपीतांना जेल दाखल करण्यात आलेले आहे.

**नाकाबंदी/पेट्रोलींग आणि कोंबिग** :— नगर परिषद/पंचायत क्षेत्रात काल दिनाकं ३०/११/२०२५ पासुन सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत सतत पेट्रोलींग सुरू असुन अतिरिक्त बंदोबस्त पुरविण्यात आला आहे. तसेच सर्व पोलीस स्टेशन मध्ये सायरनसह गस्त घालुन बेकायदेशीर दारू आणि पैसे वाटपाविरुद्ध कारवाई करण्यात येईल याबाबत घोषणा देण्यात येत आहे. दिवसा आणि रात्री ड्रोन पेट्रोलींग सुरू असुन आंतर राज्यिय सिमेवर बॅरिकेटस् सह नाकाबंदी तैनात करण्यात आली असुन वाहनांची तपासणी केल्या जात आहे. **तसेच विशेष मोहीम राबवुन स्थानिक गुन्हे शाखेचे विविध पथके तयार करून हॉटेल्स, लॉज, धाबे आणि फार्म हाऊस, गेस्ट हाउस ची तपासणी करण्यात येत आहे. सदर मोहीम दिनांक ०४/१२/२०२५ रोजी पर्यंत राबविण्यात येणार आहे.**


श्री पांडुरंग प्रसन्न
GOODS CARRIER
MH26BE1828
नागपूर ग्रामीण पोलीस


माल
वाहक








# मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन कन्हान आणि मौदा हद्दीतील संवेदनशिल मतदान केंद्र,एस.एस.टी पॉईन्ट तसेच स्ट्रॉग रूम येथे दिली भेट

आगामी नगर परिषद/नगर पंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने आज दिनांक ०१/१२/२०२५ रोजी मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी पोलीस स्टेशन कन्हान आणि मौदा हद्दीतील संवेदनशिल मतदान केंद्र, एसएसटी पथक (स्टॅटिक सर्व्हेलन्स टीम), तसेच स्ट्रॉग रूम ( Strong room ) येथे भेट दिली. मा. पोलीस अधिक्षकांनी मौदा हददीतील नगर पंचायत मौदा येथील स्ट्रॉग रूम, तसेच मौदा हद्दीतील एसएसटी पथकाला भेट दिली. कन्हान हददीतील कांद्री येथील संवेदनशिल मतदान केंद्र , नगर पंचायत कांद्री येथील स्ट्रॉग रूम आणि नगर परिषद कन्हान पिपरी स्ट्रॉग रूम ला भेट दिली. मा पोलीस अधिक्षकांनी स्वत: मतदान केंद्रांची पाहणी करून मतदान केंद्रांवर सुरक्षेच्या उपाययोजना तपासून घेतल्या. एसएसटी पथकाच्या सदस्यांना सतर्क राहण्याच्या तसेच एसएसटी पथकाने बेकायदेशीर हालचालींवर सर्तकतेने नजर ठेवावी आणि त्वरित कारवाई करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या. तसेच दोन्ही स्ट्रॉग रूम चे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तसेच इतर सुरक्षा उपाययोजना तापासुन संबधीतांना महत्त्वाच्या सुचना दिल्या.






## नगरपरिषद सावनेर सार्वत्रिक निवडणुक २०२५ मतमोजणी अनुषंगाने सावनेर शहरात जाणारी जड वाहतुक वळविल्याबाबत ..

नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत सावनेर येथे नगरपरिषद सावनेर सार्वत्रिक निवडणुक २०२५ अनुषंगाने दि. ०३/१२/२०२५ रोजी नगर भवन, नगर परीषद सावनेर येथे मतमोजणी होणार असुन गांधी चौक सावनेर येथे मोठया प्रमाणात गर्दी होवून वाहतुकीस अडथळा निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ नागपूर भोपाल हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ ई गोंडखैरी सावनेर हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ छिंदवाडा सावनेर हायवे, राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ सावनेर मनसर हायवे रोडनी सावनेर शहरात जड वाहतुक आल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सर्वसामान्य नागरिकांची सुरक्षा व वाहतुक सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून तसेच अपघाताची शक्यता टाळण्याच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतुकीची कोंडी निर्माण होवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये, तसेच रोडवर गंभीर व प्राणांकित अपघात होवू नयेत याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या आदेशान्वये सदर अधिसुचना दि. ०३/१२/२०२५ चे

सकाळी ०६.०० वाजता पासुन ते मतमोजणी प्रक्रिया संपेपर्यंत वाहतुक खालील प्रमाणे वळविण्यात आली आहे.

**राष्ट्रीय महामार्ग क्र. ४७ नागपूर भोपाल महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ ई गोंडखैरी सावनेर महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४७ छिंदवाडा सावनेर महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ सावनेर मनसर या महामार्गाने सावनेर शहरात येणारी वाहतुक सावनेर आउटर बायपासने वळविण्यात येत आहे.**

## गौंडखैरी पुलाचे कामकाज सुरू होणार असुन वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी जड वाहनांनी कळमेश्वर बायपास मार्गाचा वापर करणेबाबत.

दिनांक ०२/१२/२०२५ रोजी पासुन कळमेश्वर पोलीस स्टेशन हद्दीतील गौंडखैरी पुल, चौदामैल चे बांधकामाला सुरवात होणार असुन पुढील १२ दिवसांपर्यंत एका बाजुचा रस्ता बंद करण्यात येवुन येणारे जाणारे वाहने एकाच रस्त्यावरून वळविण्यात येणार आहे. त्यामुळे सदर मार्गाने जड वाहन गेल्यास सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी होवु शकते किंवा वाहतुक मंदावु शकते त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकते. त्याकरीता अमरावती कडुन येणारे जड वाहनांनी कोंढाळी वरून काटोल मार्गे कळमेश्वर बायपास या मार्गाचा वापर करावा तसेच नागपुर कडुन जाणारे जड वाहनांनी कळमेश्वर बायपास, काटोल मार्गे ते कोंढाळी या मार्गाचा वापर करावा. जेणे करून सदर मार्गावरील वाहतुक सुरळीत होवुन वाहतुक कोंडी होणार नाही.

# जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद ४० गोवंश जनावरांची सुटका,केळवद पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ३०/११/२०२५ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मध्यप्रदेश राज्यातुन एन.एच ४७ पांढर्णा—नागपूर हायवे मार्गे गोवंशनी भरलेल्या एक कंटनेर क्र आर.जे ०९—जि.बी—९३६५ सावनेरच्या दिशेने येत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी आर.टि.ओ चेक पोस्ट येथे नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान एक कंटनेर क्र आर.जे ०९—जि.बी—९३६५ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन वाहनाची तपासणी केली असता **वाहन चालक नाव रविशंकर रामसिंग कुशवाह, वय ३० वर्ष, रा. राजपुर देहात, तह. सिकंदरा जि. कानपूर (उ. प्र) व सोबत असलेले दोन इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्यांनी आप—आपले नाव १) शोयब अली मुनीप अली, वय २४ वर्ष, रा.ईस्लामपुर, तह.मालपुरा जि.टोक ( राजस्थान)२) अजय विरेंद्र कुशवाह, वय २४ वर्ष, रा.राजपूर, देहात तह.सिकंदरा जि.कानपूर (उ.प्र) असे मिळुन आले.** पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ४० गोवंश जनावरे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन,शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून एक एक कंटनेर क्र आर.जे ०९—जि.बी—९३६५ किंमती ३५,००,०००/— रूपये आणि ४० गोवंश जनावरे किंमती ४,२५,००० /— रूपये आणि ३ अॅड्रॉईड मोबाईल असा एकुण किंमती ३९,७०,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला. सुटका केलेल्या जनावरांना य श्री कृष्ण भगवान गोशाळा गोंडेगाव, ता. नरखेड येथे देखभालीकरीता दाखल करण्यात आले आहे.

नुमद प्रकरणी आरोपीतांच्या विरूध्द कलम, २८१,३(५),४९ भारतीय न्याय संहिता सह कलम ११(१)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागवणे प्रति. अधिनियम १९६० सहकलम ५(अ), ९ महाराष्ट्र प्राणी संरक्षन अधि. १९७६ सहकलम ११९ म.पो.का सहकलम १८४ मो. वा.का प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम ,भान्यासं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या विनापरवाना चारचाकी वाहनातुन विदेशी दारूची विक्री आणि देशी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हे नोंद, कन्हान पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ३०/११/२०२५ कन्हान पोलीस अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना गुप्तबातमीदारांच्या खात्रीशीर माहीती वरून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रं. १** गुप्तबातमीदारा कडुन खात्रीशीर **माहीती मिळाली कि, बबलु कमाले पान पॅलेस जवळ शिवाजी नगर कन्हान येथे एक इसम चार—चाकी वाहनातून विदेशी दारू स्वतः जवळ बाळगुन अवैधरित्या विक्री करीत आहे.** मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी पोहचुन कारवाई केली असता पाहणी केली असता **Renault Duster वाहन क्रं एम.एच ४० बी ई १६८८** हे वाहन मिळुन आले. वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात वेगवेगळया कपंनीची विदेशी दारू मिळुन आली.

आरोपी आकाश प्रकाश सोनवने वय ३२ वर्ष रा. स्वामी विवेकानंद नगर कन्हान **हा अवैधरीत्या विदेशी दारूची विक्री करतांना मिळुन आला.** पोलीसांनी पंचासमक्ष **१.ROYAL STAG DELUXE WHISKY ९० एम. एल.चा एकुण ४९ काचेच्या बॉटल प्रति बॉटल किं. १४०/—रू. प्रमाणे असा किंमती ६,८६०/— रूपये, २. एक २००० एम. एल. ROYAL STAG DELUXE WHISKY प्लॉस्टीक बॉटल किमंती २,८००/— रूपये,३. एक २००० एम. एल. ROYAL GREEN WHISKY प्लॉस्टीक बॉटल किमंती २,८००/— रूपये, ४. Renault Duster वाहन क्रं एम.एच ४० बी ई १६८८ किमंती ५,००,०००/— रूपये, असा एकुण ५,१२,४६०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

कारवाई क्रं. १ कन्हान पोलीस पेट्रोलींग करीत असतांना त्यांना एक **संशयीत मोटर सायकल क्रं एम.एच ३१ सी. यु. ००३२** हे वाहन मिळुन आले. वाहन चालक प्रविण चंद्रभान शेलारे, वय ४५ वर्षे,रा संताजी नगर,कांद्री ता पारशिवणी जि नागपुर याला विचारपुस केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली असता पोलीसांनी पंचासमक्ष पाहणी केली असता १८० मिली च्या एकुण ८० देशीदारू च्या बॉटल्स् मिळुन आल्याने वाहन आणि देशीदारू असा एकुण किंमती ३६,४०० **रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**नमुद दोन्ही आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये २ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.**



## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणा—या आरोपीतांविरूध्द २ गुन्हे नोंद ,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक ३०/११/२०२५ रोजी **पो.स्टे. कळमेश्वर** येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या आरोपीतांवर एकूण २ गुन्हे नोंद करण्यात आले. कळमेश्वर पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर गुप्त बातमीवरून पारधी बेडा गोंडखैरी येथे धाड टाकुन अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणाऱ्या एकुण ०२ महिला आरोपीचे ताब्यातुन एकुण २५० लिटर मोहाफुल दारू आणि ४४०० लिटर मोहाफुल सडवा प्लास्टीक ड्रम,लोखंडी ड्रम आणि इतर साहीत्य **असा एकुण १९०५००/— रुपयांचा मुददेमाल जप्त केला.** नाशवंत मुद्देमाल मोक्यावर पंचनामा कार्यवाही करुन नाश करण्यात आला आहे. ०२ महिला आरोपी यांचे

विरुध्द पोस्टे कळमेश्वर येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये ०२ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ

दिनांक ०१/१२/२०२५ रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपुर ग्रामीण, पोलीस भवन येथे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार समारंभ आयोजीत करण्यात आला होता. सदर समारंभात श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या हस्ते सेवानिवृत्त झालेले १. श्रेणी पोउपनि श्री अमरदीप हरिभाऊ कामठे, नेमणुक पोलीस स्टेशन, केळवद २. प्रथम लिपीक श्री प्रकाश भिमराव परतेकी, नेमणूक पत्रव्यवहार शाखा, नागपूर जिल्हा ग्रामीण यांचा शाल, श्रीफळ आणि भेटवस्तू देवुन सत्कार करण्यात आला असुन श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदार यांना पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमात श्री. हर्ष पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, पोलीस निरीक्षक, मानव संसाधन शाखेच्या प्रभारी पोलीस उपनिरीक्षक श्रीमती जोत्स्ना गिरी व मानव संसाधन शाखेचे अंमलदार हजर होते.


महाराष्ट्र पोलीस
vivo Y28


महाराष्ट्र पोलीस
vivo Y28

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे,दारू बाळगुण विक्री, वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २७ गुन्हे नोंद. ७ लाख ३६ हजरांचा मुद्देमाल जप्त

दिनांक ३०/११/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू, **मोहाफुल सडवा, मिली विदेशी दारू, वाहने,**तसेच इतर साहीत्य असा **एकुण ७,३६,११५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन नरखेड येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन जलालखेडा येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे १ गुन्हे नोंद आहे.पोलीस स्टेशन कन्हान येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन मौदा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन भिवापूर येथे २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बोरी येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे २ गुन्हा नोंद आहे . पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३ गुन्हे नोंद आहे . पोलीस स्टेशन केळवद येथे १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन देवलापार येथे ०६ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे ०२ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे ०३ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण २७ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ११८८० मिली देशी दारू, ८७१ लीटर मोहाफुल दारू, ४४० लीटर मोहाफुल सडवा, ९४९० मिली विदेशी दारू, चारचाकी तसेच दुचाकी असे वाहने, तसेच इतर साहीत्य असा एकुण ७,३६,११५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने